# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – २१ जानेवारी २०१६

## आंबेडकरवाद समानतेचे प्रतिक – डॉ.यशवंत मनोहर

मुंबई - आंबेडकरवाद हे बुध्दीप्रामाण्यवादाचे तत्वदान असून ते जिवनाची पुनर्रचना करणारे तत्वज्ञान आहे आणि हे तत्वज्ञान समानतेचे प्रतिक असल्याचे मत ज्येष्ठ साहित्यीक डॉ.यशवंत मनोहर यांनी व्यक्त केले.मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ‘ आंबेडकरवाद आणि मराठी साहित्य’ या दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात ते बोलत होते.पुढे ते म्हणाले की आंबेडकरवादाची पायाभरणी ही १९१६ ला झाली असून ते १९५६ ला पुर्णत्वास आली.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्वज्ञान हे जिवनदायी तत्वज्ञान असून ते समाजाकडून समाजाकडे जाते,आंबेडकरवाद म्हणजे विचारांची पोथी नसल्याचेही त्यांनी सांगितले.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना बालवयापासूनच विषमतेची झळ बसल्यामुळे त्यांच्या तत्वज्ञानात अधिकाअधिक जिवनाविषयीचा दृष्टिकोन प्रगल्भ होत गेल्याचेही त्यांनी आपल्या बीजभाषणात सांगितले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीवर्षानिमित्त मराठी विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये ‘आंबेडकरवाद आणि समकालीन विचारप्रवाह’ –सुधाकर गायकवाड,’आंबेडकरांची पत्रकारिता’-जयदेव डोळे,’डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची मराठी भाषणे आणि वैचारिक लेखन’-डॉ दिलीप चव्हाण,’साठोत्तरी साहित्यप्रवाह’-डॉ.प्रल्हाद लुलेकर,’आंबेडकरवाद आणि मराठी कादंबरी’-डॉ.रविंद्र ठाकुर,’आंबेडकरवाद आणि मराठी कथा’-प्रा.अविनाश डोळस,’आंबेडकरवाद आणि मराठी आत्मकथन’-डॉ.संजय करंदीकर ,’आंबेडकरवाद आणि मराठी नाटक’-डॉ कृष्णा किरवले अशा विविध विषयांवर हे चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे.

ज्येष्ठ साहित्यीक डॉ.यशवंत मनोहर यांनी आंबेडकरवादाची सैध्दांतिक मांडणी करुन अतिशय सोप्या शब्दात उलगडणी केल्याचे आभार विभागप्रमुख डॉ.भारती निरगुडकर यांनी मानले.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)